# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:23.05.2026** **वारः शनिवार**

---

1. पंतप्रधानांच्या हस्ते 51 हजार तरुणांना नेमणूकपत्रांचे दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून वाटप
2. अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो याचं चार दिवसांच्या दौऱ्यावर कोलकाता इथं आगमन
3. देशात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा, नागरिकांनी अतिरिक्त खरेदी टाळावी पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचं आवाहन
4. नीट प्रश्नपत्रिकाफुटी प्रकरणात सीबीआयकडून महाराष्ट्रातून आणखी एका महिलेला अटक, लातूरमध्ये दोन डॉक्टरांचीही चौकशी आणि
5. अमेरिकेच्या नागरिकत्वासाठीच्या ग्रीन कार्ड प्रक्रियेत मोठा बदल

**<u>पंतप्रधान-रोजगार</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 19 व्या रोजगार मेळ्यात देशबरातल्या 51 हजार नव्याने भरती झालेल्या तरूणांना नेमणूकपत्रांचे वितरण करणार आहेत. पंतप्रधान दूरदृश्य प्रणालीद्वारे या कार्यक्रमामध्ये सहभागी होणार आहेत. देशभरात 47 ठिकाणी आयोजित केल्या जाणाऱ्या 18 रोजगार मेळ्यांमध्ये आयोजित केले जाणार असून जवळपास 12 लाख नेमणूक पत्रांचे वितरण होणार आहे. राष्ट्र निर्माणामध्ये योगदान देणाऱ्या तरुणांच्या सक्षमीकरणासाठी त्यांना अर्थपूर्ण संधी उपलब्ध करून देण्यात रोजगार मेळा महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

**<u>सायप्रस निवेदन</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सायप्रसचे राष्ट्राध्यक्ष निरोस ख्रिस्तोडौलिडस यांनी दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी बहुपक्षीय प्रयत्नांना बळ देणे आणि संयुक्त राष्ट्राच्या चौकटीत आंतरराष्ट्रीय दहशतवादावरील सर्वसमावेशक कराराला लवकरात लवकर अंतिम स्वरूप देऊन तो स्वीकारण्याचे आवाहन केले आहे. भारत आणि सायप्रस यांच्यादरम्यान काल दिल्ली इथं झालेल्या बैठकीनंतर दोन्ही देशांनी संयुक्त निवेदन जारी केले. यामध्ये संयुक्त राष्ट्र आणि युरोपियन महासंघाने घोषित केलेल्या आणि संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या निर्बंध समितीच्या यादीत समाविष्ट असलेल्या सर्व दहशतवाद्यांविरूद्ध आणि दहशतवादी संघटनांविरूद्ध समन्वयाने कठोर कारवाई करण्याचे आवाहन केले आहे. दहशतवादाशी निगडीत आर्थिक व्यवहार, हिंसक कारवाया यांचा सामना करण्यासाठी अधिक सहकार्याची गरज असल्याचे दोन्ही नेत्यांनी अधोरेखित केले.

**<u>मार्को रुबियो</u>**

अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो आज सकाळी भारताच्या चार दिवसांच्या दौऱ्यावर कोलकाता इथं आगमन झालं. ही त्यांची पहिलीच भारत भेट आहे. कोलकाता मुक्कामादरम्यान ते मदर तेरेसा यांच्या समाधीस्थळी भेट देण्याची आणि व्हिक्टोरिया मेमोरियलला भेट देण्याची अपेक्षा आहे. त्यानंतर रुबियो यांचे दिल्लीत आगमन होमार असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतील. परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांच्याशी उद्या ते चर्चा करतील तसंच दिल्लीतल्या अमेरिकेच्या दूतावासाच्या स्वातंत्रदिन सोहळ्यालाही उपस्थित राहातील. मंगळवारी भारतनं आयोजित केलेल्या क्वाड देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीला उपस्थित राहाण्यासाठी पुन्हा दिल्ली पोहोचतील. परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार क्वाडच्या मुक्त आणि खुल्या हिंद प्रशांत क्षेत्राच्या संकल्पनेशी सुसंगत असलेल्या बैठकीत सध्या सुरू असलेल्या उपक्रमांच्या प्रगतीचा आढावा घेतला जाणार आहे.

**<u>ब्रिक्स-दूरसंचार</u>**

भारताच्या ब्रिक्स अध्यक्षतेखाली दूरसंचार विभागाने माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञान क्षेत्रातील सहकार्यासाठीच्या ब्रिक्स कार्यगटाची दुसरी बैठक आयोजित करण्यात आली होती. दूरदृश्य प्रणालीद्वारे जालेल्या बैठकीत डिजीटल तंत्रज्ञान, आगामी संपर्क जाळे,

नवोन्मेष, डिजीटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासासाठी क्षमता बांधणी या क्षेत्रांत सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी ब्रिक्स राष्ट्रांची सामायिक वचनबद्धता दिसून आली.

**<u>पियुष गोयल</u>**

भारताच्या वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेतील गुंतवणुकीच्या संधींवर चर्चा करण्याच्या उद्देशाने केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी काल अमेरिकेच्या 'इन्व्हेस्टमेंट कंपनी इन्स्टिट्यूट'चे आशियाचे व्यवस्थापकीय संचालक मॅथ्यू मोहलेनकॅम्प यांची नवी दिल्लीत, भेट घेतली. अशी माहिती गोयल यांनी समाजमाध्यमावरील संदेशात दिली आहे.

**<u>इंधन साठा</u>**

देशात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून टंचाई नसल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. देशभरात इंधन पुरवठा स्थिर असून, नागरिकांनी घाबरून जाऊन खरेदी न करता गरजेनुसार इंधन खरेदी करावं असा सल्ला समाजमाध्यमांवरील संदेशातून दिला आहे. काही किरकोळ विक्री केंद्रांवर येणारा ताण तेल विपणन कंपन्याद्वारे देखरेख ठेवून समन्वित वितरणाद्वारे हाताळला जात असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे. दरम्यान, देशभरात आज पेट्रोल आणि डिझेल च्या दरात प्रति लीटर 91 पैशांपर्यंत वाढ करण्यात आली. दहा दिवसांतली ही तिसरी दरवाढ आहे.

**<u>नीट-अटक</u>**

नीट प्रश्नपत्रिकाफुटी प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने- सीबीआयने, महाराष्ट्रातील पुणे शहरातून आणखी एका महिलेला अटक केली आहे. मनीषा हवालदार असं या महिलेचं नाव असून, राष्ट्रीय परीक्षा संस्था म्हणजेच एनटीएनं तिला तज्ज्ञ म्हणून नियुक्त केलं होतं. या प्रकरणी देशभरातून 11 आरोपींना अटक झाली आहे. दरम्यान, सीबीआयनं राज्यात लातूर जिल्ह्यात डॉ. मनोज देशमुख आणि बालरोगतज्ज्ञ डॉ. विनोद स्वामी या दोन डॉक्टरांचीही चौकशी केली आहे. या दोन्ही डॉक्टरांनी पी. व्ही कुलकर्णी या आरोपीमार्फत आपल्या पाल्यांसाठी फुटलेला प्रश्नसंच विकत घेतल्याचा संशय सीबीआयनं संशय व्यक्त केला आहे. तपासादरम्यान आणखी काही पालक, विद्यार्थी आणि मध्यस्थांची नावे समोर येण्याची शक्यता असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. लातूरसह महाराष्ट्राच्या इतरही अनेक भागांमध्ये सीबीआयचा तपास वेगाने सुरू आहे.

**<u>पुरस्कार</u>**

लेबनॉनमधील संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमेत कार्यरत असलेल्या भारतीय लष्कराच्या अधिकारी मेजर अभिलाषा बराक यांची प्रतिष्ठित '2025 संयुक्त राष्ट्राच्या मिलिटरी जेंडर ॲडव्होकेट ऑफ द इयर' पुरस्कारासाठी निवड झाली आहे. मेजर बराक सध्या लेबनॉनमधील संयुक्त राष्ट्रांच्या अंतरिम युनिफिल या दलात भारतीय बटालियनमध्ये महिला पथकाच्या कमांडर म्हणून कार्यरत आहेत. मेजर बराक हा सन्मान मिळवणाऱ्या तिसऱ्या भारतीय शांतता सैनिक ठरल्या आहेत.

**<u>इंडो-तिबेट महिला पर्वतवीर</u>**

भारत-तिबेट सीमा पोलिस दलाच्या माउंट एव्हरेस्ट चढाईच्या पहिल्या यशस्वी मोहिमेसाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी महिला संघाचे अभिनंदन केलं आहे. समाज माध्यमावरून लिहिलेल्या संदेशात शहा यांनी दुर्गम भूप्रदेशात आणि आव्हानात्मक हवामानात ही अभूतपूर्व कामगिरी साध्य करून या संघाने त्यांच्या दलाचं राष्ट्र प्रथम हे ब्रीद सार्थ ठरवल्याचं नमूद केलं आहे.

**<u>अग्नि</u>**

अग्नि 1 या लघु पल्ल्याच्या बॅलास्टिक क्षेपणास्त्राची चाचणी ओडिशाच्या चंदीपूर एकात्मिक चाचणी केंद्रातून काल यशस्वीरित्या पार पडली. संरक्षण मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार या प्रक्षेपणामुळे सर्व कार्यात्मक आणि तांत्रिक मापदंड पडताळून पाहिले गेले आहे. ही चाचणी स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांडच्या देखरेखीखाली पार पडली. अग्नी-1 हे भारताच्या सामरिक क्षेपणास्त्र कार्यक्रमाचा एक भाग म्हणून स्वदेशी बनावटीचे, कमी पल्ल्याचे, जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आहे.

**<u>ग्रीनकार्ड अमेरिका</u>**

अमेरिकेत ट्रम्प प्रशासनाने अमेरिकेच्या नागरिकत्वासाठीच्या ग्रीन कार्ड प्रक्रियेत मोठा बदल जाहीर केला आहे. अमेरिकेत कायमस्वरूपी वास्तव्यासाठी अर्ज करणाऱ्या परदेशी नागरिकांना आता अर्ज करण्यासाठी मायदेशी परत जावं लागणार आहे. युएस सिटिझनशिप अँड इमिग्रेशन सर्विसेसच्या धोरणात्मक लेखी संदेशात नमूद केल्यानुसार केवळ अपवादात्मक परिस्थितीतच अमेरिकेतून

ग्रीन कार्डला मंजुरी मिळू शकेल. त्यामुळे परदेशी नागरिकांना अमेरिकेच्या नागरिकत्वासाठी परदेशातून अथवा मायदेशातूनच दुतावासाची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. या निर्णयाचा परिणाम सध्या अमेरिकेत तात्पुरत्या व्हिसावर कायदेशीर वास्तव्य करणाऱ्या लाखो नागरिकांवर होण्याची शक्यता आहे.

**केविन वॉर्श**

अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्ह बोर्ड ऑफ गव्हर्नन्स चे अध्यक्ष म्हणून केविन वॉर्श यांनी काल शपथ घेतली. जेरोम पॉवेल यांच्या जागी वॉर्श यांची नेमणूक झाली आहे. पॉवेल यांच्याशी व्याजदर धोरणाबाबत निर्माण झालेल्या मतभेदानंतर आणि त्यानंतर सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती करण्यात आली आहे.

**तुलसी गबार्ड**

अमेरिकेच्या 'नॅशनल इंटेलिजन्स'च्या संचालिका तुलसी गॅबार्ड यांनी आपल्या पदाचा राजीनामा देत असल्याची घोषणा केली आहे. त्यांचे पती अब्राहम विल्यम्स यांना हाडांचा अत्यंत दुर्मिळ प्रकारचा कर्करोगाचं निदान झाल्यानंतर, त्या 30 जूनपासून कार्यमुक्त होतील. अशी घोषणा त्यांनी केली. गेल्या दीड वर्षांपासून 'नॅशनल इंटेलिजन्स संचालकांच्या कार्यालया'चे नेतृत्व करण्याची संधी मिळाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. 'नॅशनल इंटेलिजन्स'चे प्रिंसीपल डेप्युटी डिरेक्टर ॲरॉन लुकास हे 'नॅशनल इंटेलिजन्स'चे प्रभारी संचालक म्हणून कार्यभार सांभाळतील. असं ट्रंप यांनी आपल्या संदेशांत म्हटलं आहे.

**स्पेस एक्स**

अमेरिकेतील स्पेसएक्स या अंतराळ संस्थेने आज सकाळी त्यांचा सर्वांत मोठ्या आणि शक्तीशाली स्टारशिप सुपर हेवी रॉकेट प्रणाली प्रक्षेपित केली. त्यामुळे चंद्र आणि मंगळ यांच्यावरील मोहिमांसाठी पुनर्वापर करण्यायोग्य अंतराळयान विकसित करण्यायोग्य अंतराळयान विकसित करण्याच्या प्रयत्नांमधला हा एक महत्त्वाचा टप्पा पार झाला आहे.

**सेबी आर्थिक प्रभावक**

भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ म्हणजेच सेबीने दिशाभूल करणाऱ्या अनेक अनोंदणीकृत आर्थिक प्रभावक म्हणजेच इन्फ्लूएनसर्स आणि संस्थांवर रोखे बाजारामध्ये काम करण्यास बंदी घातली आहे. समाज माध्यमांवरील विविध व्यासपीठांच्या माध्यमातून पंप अँड डंप रॅकेट चालवल्याचा आरोप या संस्था, प्रभावकांवर आहे.

**मुंबई-मांडवा-रायगड**

मुंबई ते मांडवा या जलमार्गावरील जलवाहतूक 26 मे पासून बंद होणार असल्याची माहिती मेरिटाईम बोर्डाने दिली आहे. मुंबईहून अलिबागला जाण्यासाठी सोयीच्या असलेली ही वाहतूक असून गेट वे ऑफ इंडियावरून लॉन्च रवाना होतात. राखी पौर्णिमेनंतर ही सेवा पूर्ववत सुरू होईल.

# या बरोबरच हे ऱाष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.